# मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव

▫ नॅक प्रमाणित 'अ' श्रेणी (CGPA 3.63) ▫ युजीसी द्वारा गौरवान्वित 'कॉलेज वुईथ पोटेन्शिअल फॉर एक्सलन्स'
▫ आय.एस.ओ. 9001:2008 ▫ डीबीटी मंत्रालय द्वारा 'स्टार कॉलेज' सन्मान

## अहवाल - 2015-16

दि. 15-06-2016 रोजी नवीन शैक्षणिक वर्ष सुरु झाले. यावर्षी वरिष्ठ महाविद्यालयांत 5582, कनिष्ठ महाविद्यालयांत 3180 अशा एकूण 8762 विद्यार्थ्यांनी अध्ययन केले.

मू.जे.महाविद्यालयांतील शिक्षक वृंद पुढीलप्रमाणे आहे -

**शिक्षक :**

| | | |
|---|---|---|
| वरीष्ठ महाविद्यालय | : | 84 |
| कनिष्ठ महाविद्यालय | : | 30 |
| शिक्षण सेवक | : | 16 |
| | | ==== |
| | एकूण | 130 |

**शिक्षकेतर वृंद :** एकूण 67

मार्च / एप्रिल ,2016 मध्ये झालेल्या विविध परीक्षांमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांची माहिती खालील प्रमाणे आहे.

| परीक्षा | मार्च 2015 | | | मार्च 2016 | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | शेकडा निकाल | बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | शेकडा निकाल |
| 12वी कला | 113 | 74 | 65.49 | 101 | 63 | 63.00 |
| 12वी वाणिज्य | 510 | 450 | 88.24 | 447 | 412 | 93.18 |
| 12वी विज्ञान | 832 | 795 | 95.55 | 907 | 866 | 95.47 |
| 12वी एम.सी.व्ही.सी. | - | - | - | 62 | 45 | 71.00 |
| कला शाखा (पदवी) | 254 | 172 | 67.72 | 284 | 218 | 76.76 |
| कला शाखा (पदव्युत्तर) | 388 | 245 | 63.14 | 278 | 217 | 78.06 |
| विज्ञान शाखा (पदवी) | 365 | 237 | 64.93 | 432 | 293 | 67.82 |
| विज्ञान शाखा (पदव्युत्तर) | 171 | 68 | 39.77 | 171 | 47 | 27.49 |
| वाणिज्य शाखा (पदवी) | 368 | 255 | 69.29 | 341 | 246 | 72.14 |
| वाणिज्य शाखा (पदव्युत्तर) | 145 | 100 | 68.97 | 163 | 86 | 52.76 |
| व्यावसायिक (पदवी) | - | - | - | 116 | 97 | 83.62 |

## विशेष उल्लेखनीय

1. मू.जे.महाविद्यालयाचे स्वामी विनेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाचे नामकरण करण्यात आले.
2. डॉ.पी.आर.चौधरी यांची धनाजी नाना महाविद्यालय,फैजपूर येथे प्राचार्य म्हणून नियुक्ती झाली.
3. डॉ. आर. आर. भालसिंग (भूगोल विभाग), प्रा. आर. एस. भागडीकर (संख्याशास्त्र विभाग) सेवानिवृत्त झाले.
4. सन 2015 साठीचा आनंदयात्री डॉ.अण्णासाहेब बेंडाळे उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार डॉ. व्ही. एस. झोपे तर उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार श्री.गलू सोपान पाटील यांना प्रदान करण्यात आला.
5. डॉ. ए. पी. सरोदे यांची वाणिज्य शाखा उपप्राचार्य पदी निवड करण्यात आली.
6. डॉ. आर. आर. अत्तरदे (पदार्थविज्ञान), डॉ. प्रदीप एम. जोशी (मॅनेजमेंट विभाग), डॉ. प्रणव पाटील (कॉम्प्युटर सायन्स), डॉ. कुणाल इंगळे (गणित) यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केली.
7. श्री. दत्तात्रय रामचंद्र कापुरे यांना उ.म.वि. कडून महाविद्यालयीन स्तरावरील उत्कृष्ट शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार प्राप्त झाला.
8. डॉ.जयंत चौधरी (गणित विभाग), प्रा.रजनी पी.बोंडे (इंग्रजी विभाग), प्रा.विजय लोहार, (हिंदी विभाग), प्रा.रोशनी पवार (हिंदी विभाग), प्रा.नुतन राठोड (प्राणीशास्त्र विभाग),डॉ. लक्ष्मण वाघ, (संरक्षणविभाग) यांना यु.जी.सी. मायनर रिसर्च प्रोजेक्ट मंजुर झाले.

9. Vice chancellor Research Motivation Scheme अंतर्गत प्रा.एस.जे.चंद्रात्रे, डॉ.लिना एस.बऱ्हाटे, डॉ.एस.एस.टोणगावकर, डॉ.बी.आर.कवीमंडन, डॉ.एम.झेड. चोपडा हे प्राध्यापक वरील प्रोजेक्टवर काम करीत आहेत.
10. राजीव गांधी रिसर्च स्किम अंतर्गत प्रा.लिना वाय.भोळे, प्रा.एन.जी.महाजन, प्रा.डॉ.एम.झेड. चोपडा, डॉ.बी.आर. कवीमंडन, प्रा.एस.जे.चंद्रात्रे हे वरील स्किम अंतर्गत काम करीत आहेत.
11. माणुसकी या सामाजिक उपक्रम अंतर्गत 'प्रत्येकातल्या कोमलसाठी'पेपर रद्दी संकलन हा उपक्रम दि. 14 फेब्र. 2016 रोजी राबविण्यात आला होता. त्यामध्ये जळगाव शहरातील 35 ठिकाणाहून 6.50 हजार किलो रद्दी संकलित करुन त्यातून 70 हजार प्राप्त झाले. ती रक्कम व इतर देणग्यांसोबत डॉ. अविनाश सावजी प्रणित 'प्रयास' या सामाजिक संस्थेस रु. 1 लाख 5 हजार देण्यात आली.
12. विद्यापीठ गुणवत्ता यादीत या महाविद्यालयाच्या एकूण 28 विद्यार्थ्यांचा समावेश आहे.
13. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित विविध शाखांमध्ये 35 प्रमाणपत्र / पदविका / उन्नत पदविका / पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम मंजूर करण्यात आले व त्यात अनेक विद्यार्थी सहभागी झाले आहेत. विशेष म्हणजे पदवीचे शिक्षण घेत असतांना हे व्यवसायाभिमुख प्रमाणपत्र / पदविका / उन्नत पदविका / पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमही पूर्ण करता येतात.

1) विशेष गुणवत्ता :-

मार्च, 2015 मध्ये झालेल्या 12 वी च्या परीक्षेच्या निकालात मू. जे. महाविद्यालयाने आपली गौरवशाली परंपरा यंदाही कायम राखली आहे. विशेष उल्लेखनिय बाब म्हणजे पाटील आदीनाथ संजय हा विद्यार्थी शेकडा 94.62 टक्के गुण मिळवून विज्ञान शाखेत महाविद्यालयात सर्व प्रथम आला. काबरा मानसी दीपक ही विद्यार्थीनी शेकडा 92.62 टक्के गुण मिळवून वाणिज्य शाखेत प्रथम व कला शाखेतून कु. देऊळगावकर जान्वही गोविंद  ही विद्यार्थिनी 85.38 टक्के गुण मिळवून महाविद्यालयातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे.

विज्ञान शाखेत 90 टक्केपेक्षा जास्त गुण मिळवून 07 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत तर 85 ते 90 गुण मिळविणारे 44 विद्यार्थी आहेत. वाणिज्य शाखेत 90 टक्के पेक्षा अधिक गुण मिळविणारे 09 विद्यार्थी आहेत तर 85 ते 80 टक्के गुण मिळविणारे 36 विद्यार्थी आहेत. कला शाखेत 70 टक्के पेक्षा जास्त मिळविणारे 13 विद्यार्थी आहेत.

विशेष खास बाब म्हणजे विज्ञान शाखेतील पाटील आदीनाथ संजय या विद्यार्थ्यास  संस्कृत व गणित या विषयांत 100 पैकी 100 गुण मिळालेले आहे. तसेच वालेचा भावेश दिवाण व पाटील शुभम शांताराम या विद्यार्थ्यांना गणित विषयात 100 पैकी 100 गुण मिळालेले आहेत.  वाणिज्य शाखेतून वाणी वेंदागी संजय, पोपली जया घनःशाम, चोपडा समीक्षा नितीन, तलरजा पियुष सुनिल, चौधरी देवेंद्र दिलीप, दाणी ऋषिकेश विश्वास, निळे ऋतुजा दिपक, धिंगराणी हितेश विष्णू या विद्यार्थीनीस अकाऊंट विषयात 100 पैकी 100 गुण मिळालेले आहेत. तसेच रावलानी सुरक्षा सुनिलकुमार, मंधान निशा विजय यांना गणित विषयात 100 पैकी 100 गुण मिळालेले आहेत. संस्कृत विषयात देऊळगावकर जान्हवी गोविंद या विद्यार्थीनीला 100 पकी 100 गुण मिळाले आहेत. महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा 95.47 टक्के , वाणिज्य शाखेचा 93.18 टक्के व कला शाखेचा 63 टक्के निकाल तसेच व्यवसाय अभ्यासक्रमाचा निकाल 71 टक्के लागला आहे.

विद्यार्थ्याचा विविध क्षेत्रातील सहभाग व यश :-

यावर्षी क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात महाविद्यालयाने अनेक उपलब्धी प्राप्त केल्या आहेत.

2) जिमखाना :-

शैक्षणिक वर्ष 2015-16 मध्ये आपल्या वरिष्ठ महाविद्यालयातील एकूण 284 खेळाडूंनी विविघ खेळात भाग घेतला. त्यापैकी जळगाव विभागात 81 खेळाडूंची निवड झाली. तसेच उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संघात 30 खेळाडूंची निवड झाली. अश्वमेघ स्पर्धासाठी 07 खेळाडूंची निवड झाली. महाविद्यालयाचे एकूण 08 संघ विजयी झाले, 04 संघ उपविजयी झाले.

कनिष्ठ महाविद्यालयातील 1 खेळाडू आंतराष्ट्रीय स्तरावर, 9 खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर, 54 खेळाडूंनी शालेय राज्यस्तरावर, 257 खेळाडूंनी शालेय विभागीय स्तरावर, 379 खेळाडूंनी जिल्हास्तरावर सहभाग घेतला.

2) एन.सी.सी :-

शैक्षणिक वर्ष 2015-16 मध्ये राष्ट्रीय छात्रसेनेत 299 विद्यार्थी व विद्यार्थिनींनी छात्र सेनेच्या प्रशिक्षणाचा लाभ घेतला. वर्षभरात एन.सी.सी.प्रशिक्षणाबरोबर अनेक सामाजिक कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण, गांधी जयंती उपक्रम-स्वच्छता अभियान, नैसर्गिक आपत्ती प्रशिक्षण, रक्तदान,दक्षता जन जागृती मोहीम आणि पोलीस दिन, कारगील विजय दिन, इत्यादि उपक्रमांमध्ये आपला सहभाग नोंदविला.

आपल्या महाविद्यालयातील कॅडेट गोविंदा विनोद पाटील आणि सचिन गणेश पाटील या विद्यार्थ्याची दिल्ली येथील थल सेना कॅम्पसाठी सहभाग नोंदविला. याशिबिरात यश मिळविण्यासाठी अनेक गाळण चाचण्या पार करणे अवघड असते. महाविद्यालयासाठी विशेष अभिमानाची बाब म्हणजे आजतागायत 64 कॅडेड्स नी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनी होणाऱ्या तसेच थल सेना शिबिरात यशस्वीरित्या सहभाग नोंदविला.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही एन.सी.सी.च्या द्वितीय आणि तृतीय वर्षाअंती अनुक्रमे 'बी' आणि 'सी' च्या लेखी आणि प्रयुक्त क्षेत्रीय परीक्षा महाविद्यालयाच्या केंद्रावर आयोजित करण्यात आल्या होत्या. केंद्रावर एकूण 100% छात्र 'बी' प्रमाणपत्र आणि 69% छात्र 'सी' प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाले.

18 महाराष्ट्र बटालियन, एन.सी.सी.चे कमांडींग ऑफिसर कर्नल के.व्ही.विठ्ठल यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना एन.सी.सी.मध्ये का यावे ? याबद्यल मार्गदर्शन केले.

26 जानेवारी 2015 रोजी महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या हस्ते एन.आय.सी.कॅम्पमध्ये, पी.टी.एस.सी. शिबिरमध्ये, तसेच विविध उपक्रमांमध्ये विशेष यश प्राप्त केलेल्या 21 छात्र सैनिकांना गौरविण्यात आले.

3) <u>राष्ट्रीय सेवा योजना</u> :-
शैक्षणिक वर्ष 2015-16 मध्ये एकूण 250 विद्यार्थ्यानी आपला सहभाग नोंदवला. यावर्षी विशेष हिवाळी शिबीर दि. 14 डिसेंबर ते 19 डिसेंबर , 2015 या कालावधीत मौजे रायपूर ता.जि.जळगाव येथे आयोजित केले होते. या शिबिरामध्ये 125 स्वयंसेवक व 08 शिक्षक सहभागी झाले होते. या शिबिरात विद्यार्थ्यांनी श्रमदान केले, तसेच स्वच्छता व आरोग्य विषयावर व्याख्याने, पोस्टर प्रदर्शन, प्रबोधनात्मक पथनाट्य, प्रभातफेरी, इ.चे आयोजन करण्यांत आले होते.तसेच अनेक मान्यवरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच या शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय सेवा योजने द्वारे 25 विविध कार्यक्रम आयोजित करण्यांत आले.त्यामध्ये स्वच्छ मू.जे. - निर्मल मू.जे. अभियान, कचराकुंडीमुक्त जळगाव शहर, जागतिक एडस दिन, मेहरुण तलाव स्वच्छता मोहिम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन, रस्ता वाहतूक सुरक्षा अभियान अंतर्गत कार्यक्रम, पथनाट्य सादरीकरण, सामान्यज्ञान परीक्षा, सामाजिक जन जागृती रॅली, पोस्टर प्रदर्शन, उदबोधन वर्ग, आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन, प्रजासत्ताक दिन पथसंचलन शिबिर, रक्तदान शिबिर (एच.डी.एफ.सी. आणि रा.से.यो. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित), महाआरोग्य शिबिर, ग्रीन रिबन - पर्यावरण व जनजागृती, इ. कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125व्या जयंतीनिमित्त दि.6 व 7 फेब्रु. 2016 दरम्यान उ.म.वि. येथे आयोजित विद्यार्थी समता समेंलनात महाविद्यालयातील 100 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

4) <u>अभ्यासेतर उपक्रम :-</u> महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक उपक्रम राबविले जातात. वाद-विवाद मंडळ, नियोजन मंडळ, साहित्य मंडळ, कला मंडळ, विज्ञान मंच, वाणिज्य मंड व युवती सभा अशा मंडळांद्वारे व्याख्याने, परिसंवाद , विविध स्पर्धेत विद्यार्थ्यांना सहभागी करुन यश संपादित करण्यात आले.

5) <u>युवारंग - 2015 :-</u> उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा युवक महोत्सव - युवारंग 2015-16 एस.एस.बी.टी.कॉलेज ऑफ इंजिनियरींग, जळगाव येथे दि.07 ते 10 जानेवारी 2016 या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. महाविद्यालयाच्या एकूण 40 विद्यार्थ्यांनी युवक महोत्सवात सहभाग घेतला.त्याचे मुख्य वैशिष्टय म्हणजे 09 सुवर्ण, 06 रजत पदक आणि 1 कास्य प्राप्त करुन मू. जे. महाविद्यालयाने सलग दुसऱ्या वर्षी प्रथम क्रमांकाचे सर्वसाधारण विजेतेपद मिळविले. महाविद्यालयातील नाट्यशास्त्र, संगीत आणि ललित कला विभागांनी सांघिक भावनेने दिलेल्या योगदानामुळे हे यश संपादन करता आले. एकाच महाविद्यालयात सर्व प्रकारच्या कलाविष्कारांची सोय देणारे एकमेव महाविद्यालय म्हणजे मू. जे. महाविद्यालय आहे.

6) <u>कमवा व शिका योजना</u>- महाविद्यालयात गरीब, हुशार व होतकरु विद्यार्थ्याना आर्थिक साहाय्यासाठी सदरची योजना राबविली जाते. शिक्षणासोबत श्रमप्रतिष्ठा रुजविणे हा या योजनेचा मूळ हेतू आहे. या योजनेतील काही विद्यार्थ्याना वसतीगृह उपलब्ध करुन दिले जाते. यावर्षी एकूण 80 विद्यार्थ्यांना या योजनेत सहभागी करून घेण्यात आले.

7) <u>ग्रंथालय सुविधा</u> - समृध्द आणि सुसज्ज अशा आपल्या ग्रंथालयांत दरवर्षी विविध विषयांशी संबंधित असलेले संदर्भ ग्रंथ, नियतकालिके व क्रमिक पुस्तके यांची आवश्यकतेनुसार खरेदी केली जाते. महाविद्यालयाच्या परिसरातील ज्ञान प्रेमींसाठी हे समृध्द ग्रंथभांडार उपलब्ध असून त्यानुसार <u>ज्ञानरंजन सार्वजनिक वाचनालय</u> सुरु केले आहे. कथा, कादंबरी,नाटक,काव्य,चरित्र, आत्मचरित्र,अध्यात्मिक, आरोग्य विषयक पुस्तकांचा तसेच नियतकालिकांचा लाभ ज्ञान प्रेमींना होवू लागला आहे. शैक्षणिक वर्ष 2015-16 या कालावधीत ग्रंथालयात रु.6,53,990/-ची 2437 तर मायनर रिसर्च प्रोजेक्ट अंतर्गत विविध विषयांची सुमारे रु.2,31,941/- ची एकूण 413 पुस्तके खरेदी करण्यांत आली. 194 पुस्तके देणगी रुपाने प्राप्त झाली. त्यामुळे ग्रंथालयांत 3044 पुस्तकांची भर पडली असल्यामुळे ग्रंथसंपदा 1,48,346 एवढी झाली आहे. यावषी ग्रंथालयात सीडी/डीव्हीडी. आणि इ-बुक्स खरेदी करण्यात आली आहे. ग्रंथालयांत रु.1,41,283/- ची 211 नियतकालिके नियमित येत असतात. विद्यार्थ्यांना नियमित स्वयंअभ्यास करता यावा यासाठी ग्रंथालयात स्वतंत्र अभ्यासिका (वाचन कक्ष) असून तेथे सर्व प्रकारची क्रमिक पुस्तके, वर्तमान पत्र, प्रश्नसंच, स्पर्धा परीक्षांना उपयुक्त ठरणारी पुस्तके नियतकालिके उपलब्ध करुन दिली जातात. अभ्यासिका सकाळी 7 वाजेपासून ते रात्री 12 वाजेपर्यंत वाचन कक्ष विद्यार्थ्यांसाठी खुली असते. परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका रविवारी देखील सकाळी 08 ते दुपारी 03 वाजेपर्यंत सुरु ठेवली जाते.या संधीचा लाभ अनेक गरजू आणि हुशार विद्यार्थी घेत असतात. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे बी.लिब.व एम.लिब.हे अभ्यासक्रम चालविले जातात.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे ग्रंथालयशास्त्र प्रमाणपत्र शिक्षणक्रम हा अभ्यासक्रम देखील सुरु करण्यांत आला आहे. www.mjcollegelibrary.kces.in या नावाने ग्रंथालयाचे पोर्टल

सुरु करण्यात आले असून त्यावर 'वर्ड ऑफ द डे', राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील बातमी, तसेच अभ्यासक्रमाशी संबंधित ऑडियो/व्हीडीयो आणि पीडीएफ फाईल संकलित करण्याचे काम प्रस्तावित आहे. पुरातन धार्मिक ग्रंथ/हस्तलिखित पुढील पिढीस ज्ञात व्हावेत या दृष्टीने त्यांना स्कॅन करुन इमेज व पी.डी.एफ. फॉरमॅट मध्ये जतन करण्याचे कार्य ग्रंथालयातर्फे सुरु आहे. त्याअंतर्गत पाळधी, ता. धरणगाव, जि. जळगाव येथील श्री. ललित शिंपी यांचेकडील एकूण 7 पुरातन ग्रंथ स्कॅन करण्याचे कार्य सुरु आहे. त्यापैकी 02 ग्रंथ पुर्ण झालेले आहेत.

महाविद्यालयातील अंध विद्यार्थ्यांसाठी सुरु असलेल्या ''ड्रीमी आईज रिसोर्स सेंटर फॉर व्हिज्युअली चॅलेंज्ड'' तर्फे सेटंर फॉर इंटरनेट सोसायटी, बंगरुळ अनुदानित ''Android Devices Accessibility for visually challenged '' ह्या विषयावर तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन दर 2 ते 3 महिन्याआड करण्यात येत असते. या सेंटर मध्ये ब्रेल प्रिंटर खरेदी करण्यात आलेले असून त्याअंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संदर्भ पुस्तके ब्रेल लिपीमध्ये मोफत उपलब्ध करुन दिले जातात.

<u>पुस्तक पेढी योजना</u> :-

पुस्तक पेढी योजना कला शाखेतील पदवीच्या विद्यार्थ्यांकरिता असून विद्यार्थ्यांना पुस्तके वर्षभराकरिता अभ्यासाकरिता देण्यांत येतात. या शैक्षणिक वर्षात एकूण 109विद्यार्थ्यांना एकूण 278 पुस्तके अभ्यासाकरिता देण्यांत आले आहे.

तसेच महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी दरवर्षी विविध प्रकारच्या चर्चासत्र व कार्यशाळांचे विविध विभागामार्फत AMBI, RAAB, Bio-Innovo, Impact, Maestro यांचे आयोजन केले जाते. या स्पर्धांना राज्यभरातील विविध महाविद्यालयातून विद्यार्थ्यांचा सहभाग असतो. या चर्चासत्राचे / कार्यशाळेतून आयोजन स्पर्धात्मक स्वरूपाचे असते त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणात वाढ होवून त्यांचा विकास होतो.

9) <u>सन्माननीयांच्या भेटी</u> :-

शैक्षणिक वर्ष 2015-16 महाराष्ट्रातील ख्यातनाम कवि अजीम नवाज राही, डॉ. दिपक पवार (मुंबई विद्यापीठ), ॲड. अनंत खेळकर (अकोला), डॉ. पद्माकर पंडीत (बी. जे. मेडीकल कॉलेज, पुणे), श्री. सुशांत देवळेकर व श्री. विकास कांबळे (कनिष्ठ सहाय्यक, राज्य मराठी विकास संस्था) सुप्रसिद्ध लेखक श्यामसुंदर दुबे(दमोह म.प्र.), डॉ. शिवाजी देवरे (अध्यक्ष, हिंदी अध्ययन मंडळ), सुप्रसिद्ध गजलाकार डॉ. गिरीराश शरण अग्रवाल (बिजनोर, उ.प्र.), श्री. इलाही इमादार, डॉ. अशोक चक्रनारायण (माजी उप-प्राचार्य, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे), डॉ. एम. आरजी सय्यद (भूशास्त्र विभाग, पुना कॉलेज, पुणे), सुप्रसिद्ध लेखिका डॉ. मीना अग्रवाल, डॉ. रजनी जोशी (बार्शी, सोलापूर), प्रसिद्ध स्तंभलेखक श्री. विशाल चढ्ढा (दै. भास्कर, मुंबई), श्री. शेखर पाटील (दै. साईमत, जळगाव), श्री. विनोद रापतवार (जैन उद्योग समूह, जळगाव), श्री. मिलींद कुलकर्णी (संपादक, दै. लोकमत, जळगाव), श्री. हेमंत अलोणे (संपादक, दै. देशदूत, जळगाव), श्री. त्र्यंबक कापडे (संपादक, दै. दिव्यमराठी, जळगाव), श्री. आनंद आंबेकर (संपादक, दै. सकाळ, जळगाव), श्री. दिलीप तिवारी (संपादक, दै. तरुणभारत, जळगाव), श्री. धो. ज. गुरव (संपादक, दै. गावकरी, जळगाव), श्री. अनिल पाटील, संपादक, दै. पुण्यनगरी, जळगाव), श्री. विक्रांत पाटील (संपादक, दै. जनशक्ती, जळगाव), श्री. मनोज बारी (दै. देशोन्नती, जळगाव), श्री. हेमंत पाटील (संपादक, दै. बातमीदार, जळगाव), श्री. बाजीराव पाटील (जिल्हाप्रमुख, दै. सामना, जळगाव), श्री. ओमप्रकाश तिवारी (राज्यप्रमुख, दै. जागरण, मुंबई), जेष्ठ प्रत्रकार श्री. कुमार केतकर, श्री. निलेश खरे (दै.मिड डे, मुंबई), राजकीय विश्लेषक श्री. धर्मेंद्र जोरे, जेष्ठ पत्रकार श्री. जतिन देसाई, डॉ. सुंदर राजदीप (पत्रकारीता विभाग प्रमुख, मुंबई विद्यापिठ, मुंबई), डॉ. बी. व्ही. पवार (संगणक विभाग प्रमुख, उ.म.वि.जळगाव), प्रा. डॉ. आर. एल. शिंदे (संख्याशास्त्र विभाग प्रमुख, उ.म.वि. जळगाव), डॉ. श्रेयस महाजन, डॉ. श्रद्धा महाजन, प्रा. अशोक ढाके (देवसंस्कृती विश्व विद्यालय, शांतीकुंज हरिद्वार), खासदार श्रीमती रक्षा खडसे, खासदार ए. टी. नाना पाटील, जिल्हा क्रिडाधिकारी सौ. सुंनदाताई पाटील, डॉ. निलेश चांडक (कॅन्सरतज्ञ), डॉ. पंकज दाभी (गुजरात), डॉ. जयनारायण जैस्वाल (उरळीकांचन), प.पू. गोखलेदादा (डोंबिवली प.), प.पू. नंदूदादा कसरेकर (कांदळी जि.पुणे), प्रसिद्ध चित्रकार श्री. गणपत भडके, पोलिस निरीक्षक श्री. जालिंदर सुपेकर (जळगाव), श्री. अशोक जैन (अध्यक्ष, जैन उद्योग समूह, जळगाव), डी.वाय.एस.पी. सौ.मोक्षदा पाटील (जळगाव), सी.ई.ओ. श्री. अस्तिककुमार पांडे (जि.प.जळगाव), डॉ. डी. एस. जनबंधू (नागपूर), डॉ. रविंद्र गुंठे (जयपूर), डॉ. शाहा आलम (अलीगड), श्री. अनंत तोंडूलक (संमोहन तज्ञ), कर्नल राजेश भावे (पुणे), विवियन रॉड्रीक्स (राष्ट्रीय फुटबॉल खेळाडू), डॉ. केशव तुपे (सहसंचालक, उ.शि. जळगाव), डॉ. सौ. अरुणा चौधरी (प्राचार्य, चैतन्य आर्युवेद महाविद्यालय, साकेगाव)

आदि मान्यवरांनी मू. जे. महाविद्यालयास विविध प्रसंगी भेटी दिल्या.

प्राचार्य,
मू. जे. महाविद्यालय, जळगाव